# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०१

## प्रसिध्दीपत्रक

## शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) फेब्रुवारी /मार्च -२०२३ निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) फेब्रुवारी /मार्च -२०२३ मध्ये इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. विषयाची परीक्षा दिनांक १४/०२/२०२३ ते २०/०२/२०२३ या कालावधीत आणि मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि. या विषयाची परीक्षा दिनांक २७/०२/२०२३ ते ०३/०३/२०२३ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल दिनांक १८/०४/२०२३ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.विद्यार्थ्यांना गुणपत्रकांची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, (सर्व) व मुंबईसाठी शिक्षण निरीक्षक (उ./द./प.) मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे /गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाणे व छायाप्रतीसाठी मिळण्यासाठी प्रति विषय रूपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक २८/०४/२०२३ पर्यंत भरण्यात यावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती (३० श.प्र.मि.)**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी ३० श.प्र.मि. | ८१४७९ | ७५३०९ | ६०३७ | ५४३०४ | २१००५ | १३३ | ७२.१०% |
| मराठी ३० श.प्र.मि. | ५६२३७ | ५०३२८ | ५७४१ | ३५७५० | १४५७८ | १६८ | ७१.०३% |
| हिंदी ३० श.प्र.मि. | १८३९ | १६९५ | १४२ | ११६४ | ५३१ | २ | ६८.६७% |

**निकालाची संक्षिप्त माहिती (४० श.प्र.मि.)**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी ४० श.प्र.मि. | ५२५०३ | ४९४४३ | २८८७ | ३७५८४ | ११८५९ | १७३ | ७६.०१% |
| मराठी ४० श.प्र.मि. | ५२३३ | ४९२५ | ३०७ | ३०४२ | १८८३ | ०१ | ६१.७६% |
| हिंदी ४० श.प्र.मि. | ४५६ | ४३३ | २३ | २२४ | २०९ | ० | ५१.७३% |

(संगीता घोडेकर)
सहाय्यक आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१